CMYK

सुविचार
विचार करा, प्रारंभ करा, आणि आत्मविश्वासाने पूर्ण करा.

दैनिक
# आरंभ मराठी
ww.arambhmarathi.com


राजकीय कुरघोडीत नागरिकांना त्रास नको!
पेज 4

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 167 ■ रविवार,दि. 27 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# ऐन पावसाळ्यात 'तेरणा'ची पातळी खालावली

## महिनाभर पावसाने उसंत घेतल्याने पाणीपातळी पाच टक्क्याने झाली कमी

### निम्मा पावसाळा संपत आला तरी तालुक्यातील १२ तलाव अजूनही शून्यावरच

सुभाष कुलकर्णी | आरंभ मराठी

**तेर–धाराशिव तालुक्यातील सर्वात मोठा मध्यम प्रकल्प म्हणून गणल्या जाणाऱ्या तेरणा मध्यम प्रकल्पाच्या जलाशयात भर पावसाळ्यात पाणी वाढण्याऐवजी कमी होण्यास निसर्गाचा लहरीपणा कारणीभूत ठरला आहे. या परिसरात पावसाने तब्बल ४० दिवस उसंत घेतल्याने याचा फटका पाणी पातळी कमी होण्यास कारणीभूत ठरला आहे. मागील महिन्यात ४५ टक्क्यांवर गेलेली पाणीपातळी सध्या ३९ टक्क्यांवर आली आहे. ऊसाचे वाढलेले प्रमाण, त्यामुळे होत असलेला पाणीउपसा आणि पावसाने सलग ४० दिवस मारलेली दांडी यामुळे तेरणा मध्यम प्रकल्पातील पाणी कमी झाले आहे. मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पुन्हा पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे.**



तेरणा प्रकल्पात येरमाळा, तेरखेडा, भागातील पडलेल्या पावसामुळे पाणी वाढते. परंतू, साधारण मे महिन्यात पडलेल्या पावसानंतर जून, जुलै महिन्यात पावसाने तेरणा प्रकल्पच्या पाणलोट क्षेत्रात ओढ दिली. तेरणा मध्यम प्रकल्पाच्या जलाशयात यावर्षी चा पावसाळा सुरू होण्यापूर्वी ३२ टक्के पाणी उपलब्ध होते. मे महिन्यात पडलेल्या बिगर मोसमी पावसाने धरणात १० टक्के पाणी साठा वाढून तो १४ जून २०२५ रोजी ४३.४० टक्क्यावर पोहोचला होता. पावसाळा सुरू झाल्याने या धरणात मोठ्या प्रम ाणात पाण्याची पातळी वाढेल ही अपेक्षा पावसाने दडी मारल्याने फोल ठरली. जून महिन्यात व जुलै महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत पाऊस पडला नाही. धाराशिव पाटबंधारे विभागाच्या २३ जुलै २०२५ च्या अहवानुसार तेरणा धरणाच्या जलाशयात ३८.७६ टक्के पाणी साठा उपलब्ध आहे. वास्तविक पावसाळ्याचे दिवस असल्याने पाणी साठ्यात वाढ होणे अपेक्षित होते. तेरणा धरणातून धाराशिव शहर, चार गाव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पाणी उचलण्यात येते. सर्वात महत्वाचे म्हणजे या काळात पडलेल्या कमी पावसाचा फटका धरणाची पाणीपातळी कमी होण्यास कारणीभूत ठरला आहे. धाराशिव तालुक्यातील रूईभर मध्यम प्रकल्पात ० टक्के पाणी साठा होता मात्र या परिसरात पडलेल्या पावसामुळे हे धरण ४७.७ टक्के पर्यंत पोहोचले आहे. वाघोली बृहत लघू प्रकल्पातही ३६.२९ टक्के पाणी जमा झाले आहे. धाराशिव तालुक्यातील ३ मध्यम व ४१ लघु प्रकल्प व साठवण तलावापैकी फक्त राघुचीवाडी तलाव १०० टक्के भरला आहे. तर ढोकी, कोल्हेगाव, घुगी, येवती, टाकळी, सांजा क्रमांक १, सांजा क्रमांक २, आळणी, गोपाळ वाडी, पाडोळी, बोरगाव( राजे), सकनेवाडी आदी साठवण अजूनही तलाव शून्य टक्क्यावरच आहेत. निम्मा पावसाळा संपत आला तरी हे तलाव शून्य टक्क्यावर असल्यामुळे ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील पावसावर बरीच मदार असणार आहे. धाराशिव तालुक्यात गतवर्षी झालेल्या पावसामुळे ऊसाचे क्षेत्र वाढले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना या धरणातून ऊसासाठी पाणी पुरवठा केला जाईल या अपेक्षेने धरण भरण्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

# अनाथ ठरलेल्या बाळाला अखेर मिळाले आई-बाबा

## 'अंकुर' शिशुगृहात पार पडले दत्तक विधान

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्हा प्रशासन आणि बालकल्याण समितीच्या पुढाकाराने कायदेशीर दत्तक विधानाचा कार्यक्रम नुकताच 'अंकुर' शिशुगृहात पार पडला. संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून, जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत एका सुसंस्कृत दांपत्याने त्या निरागस बालकाला आपल्या कुटुंबात सामावून घेतले. उपस्थित मान्यवरांच्या डोळ्यांत पाणी आले, भावनांनी भरलेल्या वातावरणात एका बाळाचे भवितव्य उजळताना सर्वांनी साक्षीदार व्हायचा सन्मान अनुभवला. या वेळी धाराशिव जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय डॉ.शैलेंद्र चौहान, महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष विजयकुमार माने, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विभावरी खुने, 'अंकुर' संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. रमेश दापके, डॉ. सचिन रामढवे, ॲड. दत्तात्रय आवारे, प्रा. छाया दापके, साधना पाटील तसेच सामाजिक क्षेत्रातील डॉ. अर्शद सय्यद, गणेश वाघमारे, सोहेब शेख यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान जिल्हाधिकारी पुजार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''अनाथ असणं ही त्या चिमुकल्याची चूक नव्हती. पण आता त्याच्या वाट्याला आलेलं हे प्रेम, हे कुटुंब, ही स्नेहाची सावली त्याचे जीवन उजळवेल, याची आम्हाला खात्री आहे.'' तसेच संस्थेच्या वतीने उपस्थितांना आवाहन करण्यात आले की, ''वाढदिवस, लग्नवर्षगाठ किंवा सणाचा कोणताही खास क्षण 'अंकुर' शिशुगृहात येऊन साजरा करा. येथे राहणाऱ्या चिमुकल्यांना आपलेपणाचा स्पर्श द्या. तुमच्या आनंदात यांना सहभागी करून घ्या.'' कार्यक्रमाचा शेवट एका गोड अशा स्मितहास्याने आणि अश्रूंनी ओलावलेल्या आनंदाच्या क्षणांनी झाला. एका बाळाचे आयुष्य त्या दिवशी खऱ्या अर्थाने नव्याने सुरू झाले.

# जन्मदात्या आईने कोवळ्या जिवाला दहा हजारांत विकले; माणुसकीला काळिमा फासणारी घटना

## स्टॅम्प पेपरवर मुलाची विक्री करत आईने केले दुसऱ्या पतीसोबत पलायन

आरंभ मराठी | मुरुम

मुरुम शहरातून माणुसकीला काळिमा फासणारी आणि समाजमन हादरवून टाकणारी घटना समोर आली आहे. पहिल्या पतीपासून झालेल्या अवघ्या एका वर्षाच्या चिमुकल्याला पतीच्या मृत्यूनंतर नकोसा ठरवत त्याच्या आईने त्या निरागस बाळाला केवळ दहा हजार रुपयांत विकून टाकल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. यानंतर त्या महिलेने दुसऱ्या पतीसोबत पलायन केल्याचंही निष्पन्न झालं असून, या प्रकारामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची उकल चिमुकल्याच्या आजीने मुरुम पोलिसांकडे सून आणि नातवंड हरवल्याची तक्रार दिल्यानंतर झाली. ही घटना स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांच्या लक्षात आली आणि त्यांनी आजीसोबत मिळून शोधमोहीम सुरू केली. या मोहिमेतून एक अत्यंत धक्कादायक सत्य समोर आले. आईने आपल्या मुलाची 'विक्री' चक्क स्टॅम्प पेपरवर लिहून, सोलापूरमधील एका जोडप्याला केली होती. सदर चिमुकल्याला विकत घेतलेले कुटुंब सोलापूरमधील असल्याची माहिती मिळाल्यानंतर सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या मदतीने त्या बाळाला शोधून काढले आणि बालकल्याण समितीकडे सुपूर्द केले. मात्र, बाळाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला तात्काळ धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांकडून त्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, बाळ विकत घेतलेल्या कुटुंबाने रुग्णालयात येऊन गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. मात्र सामाजिक कार्यकर्ते आणि आजीने एकत्र येत ठाम भूमिका घेतली आणि बाळ परत करण्यास स्पष्ट नकार दिला. याबाबत अद्याप कोणत्याही प्रकारचा कुणावरही गुन्हा दाखल झाला नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात संबंधित महिला, बाळ विकत घेतलेले जोडपे आणि यात सहभागी असलेल्या दलालांवर तातडीने कठोर गुन्हे दाखल करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# पत्नीचे फोटो व्हायरल करण्याची धमकी, पतीने मेहुण्याकडेच मागितली खंडणी

आरंभ मराठी | धाराशिव

पतीनेच पत्नीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन मेहुण्याकडून खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. यासंबंधी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविस्तर वृत्त असे की, आरोपी उत्तम ताय्याण्णा शिंदे (रा. विजयवाडी ता. माळशिरस ता. सोलापूर) याने दिनांक २३ जुलै रोजी १२ वाजता येडशी येथे त्यांच्या पत्नी फिर्यादी संगिता उत्तम शिंदे (वय ३२ वर्षे, रा. दामाजी नगर धरमगाव रोड मंगळवेढा ता. मंगळवेढा जि. सोलापूर ह.मु. रामलिंग नगर वैद्य वस्ती येडशी) यांचा भाऊ सागर काळे याच्या मोबाईलवर संगीता यांचे काही खाजगी फोटो व गुगल पे स्कॅनर पाठवले. तसेच त्याने धमकी दिली की, गुगल पे स्कॅनरवर पैसे पाठव नाहीतर तुझ्या बहिणीचे खाजगी फोटो सोशल मीडियावर व्हायरल करेन. फोटो व्हायरल न करण्याच्या बदल्यात आरोपीने सागर काळे यांच्याकडे खंडणीची मागणी केली. आरोपी उत्तम शिंदे हा फिर्यादी संगीता शिंदे यांचा पती असून, तो सतत मारहाण करत असल्यामुळे संगीता या पतीला सोडून माहेरी भावाकडे स्थायिक झाल्या आहेत. याप्रकरणी संगिता शिंदे यांनी दिनांक २५ जुलै रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०८(२), ११५(२), ३५२, ३५१(४) सह ६६ ई माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# पर्यटनस्थळांचा एकत्रित प्रारूप आराखडा २० ऑगस्टपर्यंत

## जिल्ह्यात रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न, आमदार राणा पाटील यांची माहिती



आरंभ मराठी | धाराशिव

ऐतिहासिक, भौगोलिक आणि प्राचीन पर्यटनस्थळांचा वैभवशाली वारसा लाभलेल्या धाराशिव जिल्ह्यात कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीचे शक्तिपीठ आणि संतश्रेष्ठ गोरोबाकाका यांच्या भक्तिपीठ आहे. पर्यटन विकासाच्या माध्यमातून आपण रोजगार निर्मितीला प्रथम प्राधान्य देत आहोत. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व पर्यटन स्थळांचा एकत्रित प्रारूप आराखडा २० ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले असल्याचे 'मित्र' चे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. पर्यटन विकासातून रोजगार निर्मिती व आर्थिक सबलीकरणाच्या हेतूने नळदुर्ग, येडशी, तेर व येरमाळा आदी पर्यटन स्थळांचा एकात्मिक विकास करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. 'मित्र' संस्थेच्या माध्यमातून राज्याच्या उत्पन्न वृद्धीवर भर देत असतानाच धाराशिव जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न वाढविण्यावर नियोजनबद्ध काम सुरू आहे. त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणून जिल्ह्यातील पर्यटनस्थळे विकसित करण्यासाठी युद्धपातळीवर काम हाती घेण्यात आले आहेत. या अनुषंगाने पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांसह जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील या चार पर्यटन स्थळांचा प्रारुप एकात्मिक विकास आराखडा २० ऑगस्टपर्यंत करण्याचे ठरले आहे. या बैठकीस मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश अहिरराव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव,तहसीलदार अरविंद बोळंगे, तहसीलदार अभिजित जगताप, जया वहाने, नेहा शितोळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

### तेर नगरीचा स्वतंत्र विकास आराखडा

नळदुर्ग येथील किल्ला व सभोवतालच्या नैसर्गिक संपत्तीचा योग्य वापर करत विकास साधला जाणार आहे. तसेच बसवसृष्टी व वसंतराव नाईक स्मारकासह इतर बाबींचा विचार करून ' रोप–वे', ' हॉट एअर बलून' यासारख्या साहसी क्रीडा प्रकारांचा देखील या आराखड्यातसमावेश करण्यात येणार आहे. येडशी येथील रामलिंग अभयारण्यासह श्री क्षेत्र रामलिंग मंदिर व परिसराचा विकास, तसेच केंद्रीय रेल्वे मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेला दुर्गादेवी डाक बंगला, जुनी रेल्वेलाईन व स्टेशन तथा जुने विठ्ठलवाडी गाव मूळ ऐतिहासिक रूपात पुन्हा एकदा नव्याने साकारण्यात येणार आहे. तुळजाभवानी देवीची धाकटी बहीण म्हणून ख्याती असलेल्या श्री क्षेत्र आई येडेश्वरी देवीमंदिर परिसरात आवश्यक भूसंपादनासह एकात्मिक विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्राचीन 'तगर'चा इतिहासाला असलेली वैभवशाली प्राचीन झळाळी पुन्हा एकदा यानिमित्ताने मिळणार आहे.राज्यातील सर्वात प्राचीन मंदिर असलेल्या त्रिविक्रम मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम जवळपास अंतिम टप्प्यात आहे. या सगळ्या विकास कामांसह तेर गावाचादेखील स्वतंत्र विकास आराखडा तयार केला जात आहे. त्यातून जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळून त्यातून स्थानिक रोजगार निर्मिती वाढेल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# दोन मालवाहतूक वाहने लुटली: येरमाळा परिसरात चोरट्यांची टोळी सक्रिय

आरंभ मराठी | धाराशिव

येरमाळा परिसरात धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मालवाहतूक गाड्यांची लूट करणारी टोळी पुन्हा सक्रिय झाल्यामुळे वाहन चालकांमध्ये पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील दहा दिवसांत या मार्गावर दोन मालवाहतूक गाड्यांमधील तब्बल सव्वा तीन लाख रुपयांच्या सामानाची चोरी केल्याची घटना घडली आहे. यामध्ये १० जुलै रोजी एका गाडीतील पावणे तीन लाख रुपयांचा माल लुटला. फिर्यादी मोहम्मद छितर हनीफ (वय ४६ वर्षे, हरियाणा) हे आयशर ट्रक (क्र टीएस ०७ यु ०६२५) मध्ये हैद्राबाद येथून माल भरुन जात असताना सायंकाळी ६ वाजता तेरखेडा गावाजवळ एच पी पेट्रोपंपासमोर अज्ञात व्यक्तीने ट्रकवर चढून ट्रकची ताडपत्री फाडली. त्यातील एक कपड्याचा बॉक्स, क्लॉथ लेबल असलेला एक कारटुन बॉक्स, प्रिंटेड सारीज लेबल असलेला एक कारटुन बॉक्स, डी. नं २०३१ बॉक्स लेबल असलेला एक कारटुन बॉक्स, क्लॉथ लेबल असलेला एक काटुन बॉक्स, ॲपल जॉर्जटे लेबल असलेला एक कारटुन बॉक्स असा ट्रेकमधील एकुण २,७२,१७७ रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. याप्रकरणी दिनांक २४ जुलै रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम ३०५(ब), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तर दुसऱ्या प्रकरणात फिर्यादी दिनेश शिवराज गवशेट्टी (वय ४० वर्षे, रा. सोलापूर) हे अहमदाबादवरून ते बेंगलोरलामाल घेवून जात असताना २२ जुलै रोजी रात्री साडेअकरा वाजता येरमाळा ब्रिज ते वडगाव ब्रिज प्रवासा दरम्यान अज्ञात व्यक्तीने ट्रकची (केए २५ ए ०५२७) ताडपत्री फाडून ट्रकमध्ये प्रवेश केला. चोरट्यानी ट्रकमधील १३ पिस सिल्क साडी, १४४ पिस रेडीमेड कुर्ती, ११ पिस लेडीज ड्रेस, २ नग पंजाबी सुट, अग्रेबॉक्स फायटर शेतातील खत एक बॉक्स असा एकुण ५७,९७४ रुपये किंमतीचा माल चोरुन नेला. दिनेश गवशेट्टी यांनी दिलेल्या खबरेवरुन गुन्हा नोंदवला आहे. गाड्या लुटणारी टोळी पुन्हा सक्रिय झाल्यामुळे पोलिसांसमोर आव्हान उभे राहिले आहे. मधल्या काळात येडशी ते पारगाव दरम्यान रात्र गस्त वाढवल्यामुळे लुटीच्या घटनांवर आळा बसला होता. मात्र पुन्हा एकदा चोरटे सक्रिय झाल्यामुळे वाहनचालक चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.


# फेस ॲप हजेरीच्या निर्णयामुळे तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक

## शेतकऱ्यांना दिलासा; वेळ आणि पैसा वाचणार

आरंभ मराठी | धाराशिव

तलाठी आणि मंडळ अधिकारी हे मुख्यालयी राहत नसल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा बराच वेळ आणि पैसा खर्च होत असतो. याला निर्बंध घालण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल कर्मचारी व अधिकाऱ्यांना फेस ॲपद्वारे हजेरी लावण्याचा निर्णय नुकताच बंधनकारक केला आहे. त्यामुळे यापुढे गावपातळीवर तलाठी तसेच मंडळ अधिकारी हे शेतकऱ्यांना उपलब्ध होणार आहेत. महसूल मंत्र्यांचा हा निर्णय शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासादायक ठरणार आहे. ग्रामीण भागात तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या विरोधात शेतकऱ्यांचा कायमच रोष असतो. यावर उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. यापुढे तलाठी, मंडळ अधिकारी ते उपजिल्हाधिकारी यांना फेसॲप द्वारे हजेरी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे पंधरा – पंधरा दिवस सज्ञाकडे न फिरकणारे तलाठी आणि मंडळ अधिकारी आता गावपातळीवरील कार्यालयात दिसणार आहेत. नवीन नियमानुसार मुख्यालयाच्या गावातूनच त्यांना फेसॲपद्वारे हजेरी द्यायची आहे.

हजेरी न दिल्यास त्यांना कर्तव्यावर हजर नसल्याचे समजून गैरहजेरी टाकली जाणार आहे. जे कर्मचारी फ सॲपद्वारे हजेरी देणार नाहीत, त्यांचे ऑगस्ट महिन्याचे




वेतनही निघणार नसल्याचे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे. यापूर्वी तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, उपजिल्हाधिकारी कार्यालय येथील कर्मचाऱ्यांची आधार अपडेट हजेरी होती. परंतु तलाठी, मंडळ अधिकारी क्षेत्रिय कर्मचाऱ्यांसाठी हजेरीची कुठलीच तरतूद करण्यात आलेली नव्हती. अनेक तलाठी हे मुख्यालयी राहत नसल्याचे वास्तव असून त्यांनी नेमलेली खाजगी माणसेच तलाठ्यांची सर्व कामे पाहतात. तलाठी हे पंधरा–पंधरा दिवस सज्ञाकडे फिरकत नसल्यामुळे शेतकऱ्यांना तलाठ्यांचे शहरातील ऑफिस शोधत जावे लागते. महसूल मंत्र्यांच्या फेस ॲपद्वारे हजेरी बंधनकारक केल्यामुळे तलाठ्यांना शोधण्यासाठी शहरात जाण्याची वेळ शेतकऱ्यांवर येणार नाही. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा वाचणार आहे. महसूल विभागाने निर्णय घेतला तरी तलाठी, मंडळ अधिकारी व महसूलचे अन्य कर्मचारी या निर्णयाला कसा प्रतिसाद देतात यावर या निर्णयाचे भवितव्य अवलंबून आहे.

### सामान्य जनतेला वेळेत सेवा मिळण्याची आशा

फेस ॲपद्वारे तलाठ्यापासून ते उपजिल्हाधिकाऱ्यांपर्यंत हजेरी लावणे बंधनकारक केल्यामुळे सामान्य जनतेला वेळेत सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांनाही आपल्या जबाबदारीची जाणीव होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महसूल विभागाशी संबंधित सातबारा उतारे, उत्पन्न प्रमाणपत्र, जमीन मोजणी, फेरफार यासारख्या कामांसाठी शेतकरी व नागरिकांना आता तलाठ्यांना शोधत शहरात जाण्याची गरज भासणार नाही. फेसॲपद्वारे हजेरी बंधनकारक केल्यामुळे महसूल विभागाच्या कामामध्ये गतिमानता येऊन तलाठी, मंडळ अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांचा शेतकरी व नागरिकांशी संवाद वाढणार आहे. या संवादातून कामामध्ये सुलभता येईल यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

### तलाठ्यांची पदे रिक्त असल्यामुळे निर्णयाचा कितपत फायदा होणार याबद्दल साशंकता

धाराशिव जिल्ह्यात तलाठ्यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे दोन ते तीन गावासाठी एकच तलाठी काम पाहतात. फेसॲप द्वारे हजेरी बंधनकारक केली तरी तलाठी हे यापैकी कुठल्या गावात जाऊन हजेरी देणार हा प्रश्न निर्माण होणार आहे. तलाठ्यांबद्दल गावोगावी अनेक तक्रारी असल्यामुळे या निर्णयामुळे त्यात काही बदल होईल अशी खात्री बऱ्याच नागरिकांना वाटत नाही.




CMYK


दैनिक आरंभ मराठी

संपादकीय

रविवार,दि. 27 जुलै 2025

# ‘लिंगायत स्वतंत्र धर्मच’..अभ्यासपूर्ण प्रतिपादन

**भारतामध्ये** प्राचीन काळापासून चालत आलेला खरा संघर्ष हा वैदिक विरुद्ध अवैदिक असाच होता आणि अजूनही तो सुरु आहे.या संघर्षाचे स्वरुप कधी सुप्त तर कधी उघड असते.महाराष्ट्राच्या तळागाळात रुजलेल्या वारकरी संप्रदायाचा उगम ज्या बसवण्णाप्रणीत शरणपरंपरेतून झाल्याचे मानले जाते त्या शरणपरंपरेला म्हणजेच लिंगायत धर्मालासुद्धा वैदिक व्यवस्थेशी जीवघेणा संघर्ष करावा लागला आहे.वैदिक धार्मिक वा सामाजिक व्यवस्था ही सुप्त अजगरासारखी असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निरीक्षण होते,जे मिळेल ते गिळंकृत करायचे आणि पचवून टाकायचे,असा खाक्या असलेली ही शोषणव्यवस्था आजवर अनेक स्वतंत्र विचारप्रवाहांना गिळत आली आहे. आधी अशा वेगळ्या विचारांना कडाडून विरोध करायचा,ते विचार सांगणाऱ्यांना छळायचे,जीवानीशी मारायचे नंतर कालांतराने तो विचार आमचाच असे भासवून लोकांचा बुद्धीभेद करायचा,ही कपटनीती शतकानुशतके राबविण्यात आली आहे,ज्यात इथला शोषणवादी उच्चवर्णीय समाज सहभागी होत आलेला आहे.बसवण्णा यांनी स्थापन केलेल्या लिंगायत धर्माचीही तीच अवस्था करण्यात वैदिक व्यवस्था यशस्वी झाल्याचे दिसते. वीरशैव म्हणून लिंगायत धर्मावलंबींना वैदिक व्यवस्थेत सामावून टाकण्याचा आटापिटा अजूनही सुरुच आहे.लिंगायत हा स्वतंत्र अस्तित्व असलेला वेगळा धर्मच असताना त्यावर वीरशैवाचे बेगडी वेष्टण चढवून पुन्हा वैदिकांनी कुरघोडी केली आहे.कपट कारस्थाने करुन आणि खोट्या पोथ्यापुराणांमधून सातत्याने प्रचार–प्रसार करुन समाजाचा कसा बुद्धीभेद केला जात आहे आणि मूळ समतावादी लिंगायत धर्माचे कसे विकृतीकरण केले जात आहे




याची सविस्तर आणि अभ्यासपूर्ण चर्चा ‘लिंगायत स्वतंत्र धर्मच’ या पुस्तकामधून लेखक चन्नवीर भद्रेश्वरमठ यांनी केली आहे.मागील काही वर्षांपासून लिंगायत स्वतंत्र धर्म असल्याची जाहीर घोषणा करीत सबंध महाराष्ट्रभरात लिंगायत समाजाने आपले शक्तीप्रदर्शन करण्यास सुरुवात केली आहे.वैदिक व्यवस्थेच्या विरोधात एल्गार पुकारुन भेदाभेदविरहीत निकोप समाजरचनेचे स्वप्न साकार करणाऱ्या बसवण्णा आणि त्यांच्या शरणांच्या क्रांतीकार्याची महती सकल जगाला प्रेरणा देणारीच आहे.त्याच क्रांतीकार्याचा आणि लिंगायत हा स्वतंत्र धर्मच कसा आहे? याचे ठाम प्रतिपादन करणारी ही अभ्यासपूर्ण मांडणी आहे.बसवण्णा हाच आरंभ बिंदू असे सांगताना लिंगायत धर्माची सुरुवात त्यांच्यापासून झाली असल्याचे लेखकाने नोंदवले आहे.बसवण्णांनी बालपणीच स्त्रीसमानतेसाठी आग्रह धरला होता,तोच पुढे जाऊन त्यांचा शोषणशाहीविरुद्धचा महाविद्रोह ठरला.त्यातूनच लिंगायत धर्माची सैद्धांतिक मांडणी होऊ शकली.लिंगायत धर्म हा आचरणाला प्राधान्य देतो,प्रत्यक्ष कृती ही या धर्माला अधिक महत्त्वाची वाटते.वर्णजातीवर आधारीत भेदाभेदांना मुठमाती देणाऱ्या नव्या धार्मिक युगाचा आरंभ लिंगायत धर्माने केला,पण वैदिकांनी घुसखोरी करुन वीरशैव आणि लिंगायत एकच असे सांगण्यास सुरुवात करुन समाजात दुफळी माजविली. त्याचबरोबर अपप्रचार करुन लिंगायत धर्माला आणि शरणांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाला बदनामदेखील करण्याचा प्रयत्न चालविला. अशा सर्व बाबींचा परखड भाषेत समाचार घेणारे आणि सामान्य जनतेपुढे सत्याची मांडणी करणारे एक महत्त्वपूर्ण पुस्तक म्हणून या पुस्तकाकडे पाहायला हवे.इहवादी तत्त्वज्ञान सोप्या लोकभाषेतून जनमनात रुजविण्यात वचनसाहित्य यशस्वी ठरले,वचनसाहित्यातून लिंगायत धर्माचे नीतीशास्त्र बनले.बसवण्णांनी लिंगायत धर्मात जुनाट रुढीपरंपरांना अजिबात स्थान दिले नाही,त्या सर्व थोतांडाला झिडकारुन दिले.श्रमालाच परमेश्वर मानले.त्यामुळे स्वर्ग–नरक,पाप–पुण्य अशा कल्पना आपोआप बाद झाल्या.माणुसकेंद्रीत समाजरचना हाच लिंगायत धर्माचा मूळ पाया ठरला.जात,धर्म,व्यवसाय,वर्ण अशा सर्व भाकड गोष्टींना दुय्यम मानून लिंगायत धर्माने समाजातली विषमता नष्ट करण्याचाच विडा उचलला होता. म्हणूनच बसवण्णा आपल्या एका वचनात गर्जना करतात,वेदांवर वार करेन,शास्त्राला बेड्या ठोकीन,तर्काच्या पाठीवर आसूड ओढेन,आगमांचे नाक कापेन,मी मातंग चन्नय्याच्या घरचा पुत्रआहे पहा देवा,महादानी कुडलसंगम देवा.लिंगायत या स्वतंत्र धर्माचे संस्थापक बसवण्णा आहेत आणि त्यांच्या थोरल्या भगिनी अक्क नागम्मा यांकल्पक होत.पुढे अक्क नागम्माचे सुपुत्र चन्नबसवण्णा यांनी लिंगायत धर्माची सैद्धांतिक मांडणी केली. लिंगायत हा स्वतंत्र धर्म कसा ठरतो याचे सविस्तर विवेचन अनेक उदाहरणे देऊन लेखकाने या पुस्तकात केले आहे.लिंगायत धर्मात जन्मामुळे कुणी उच्च अथवा नीच ठरत नाही.सर्वांना समान अधिकार हाच या धर्माचा मूळ पाया आहे.धर्म हीएक समाजव्यवस्था असते.धर्म या संकल्पनेत अभिप्रेत असलेली सर्वप्रकारची वैशिष्ट्ये आणि इतर बाबी लिंगायत धर्मात आढळतील,असे निःसंदिग्धपणे लेखकाने नमूद केले आहे.लिंगायतांना हिंदू धर्मावलंबी मानणे हा वैदिकांचा डाव असल्याचे इथे लेखक स्पष्टपणे सांगतात. लिंगायत धर्माची ठळक वैशिष्ट्ये विशद करताना,लिंगायत हा एक द्रविडीयन वंश आहे,हा एक संपूर्णतः अवैदिक धर्म आहे अशा प्रमुख बाबींचा उल्लेख केला आहे.’लिंगायत स्वतंत्र धर्मच’ हे पुस्तक सत्यान्वेषी पद्धतीने लिहिण्यात आले आहे जे सत्यशोधकी परंपरेशी नाते जोडणारे आहे.लिंगायत हे हिंदू नसल्याचा स्पष्ट दावा करताना लेखकाने अनेक मुद्दे चर्चेला घेतले आहेत,तसेच अनेक पुरावे देऊन लिंगायत आणि वैदिक यांच्यातला भेद स्पष्ट केला आहे.कर्मकांड आणि पुरोहितरहित उपासनापद्धती तसेच मंदिरांचे स्तोम न माजविणे यासारख्या गोष्टींमुळे लिंगायत धर्म हा विज्ञानवादी ठरतो.वैदिकांच्या कारस्थानामुळे हा धर्म विकृत करण्यात आला असून लोक खऱ्या लिंगायत धर्मसिद्धांतापासून दूर जात असल्याचीही खंत इथे लेखक व्यक्त करतात.मानवतेचा निखळ विचार देणाऱ्या बसवण्णा यांनी लिंगायत धर्माच्या माध्यमातून निकोप समाजनिर्मिती आरंभली होती.कल्याणक्रांतीमुळे समाजातली विषमता लयास जात होती,तेच विषमतावाद्यांना नको होते,त्यांना सकलजनांचे हित साधणारी समाजव्यवस्था पसंत नव्हती मूठभरांच्या हातातच सत्तेची सुत्रे असणारी अन्यायी अव्यवस्था त्यांना पुनःप्रस्थापित करायची होती,म्हणूनच लिंगायत आणि वीरशैव यांच्यात भेद नसल्याचा अपप्रचार त्यांनी केला व खऱ्या लिंगायत धर्मावर कर्मकांडाची पुटं चढविली.आजच्या काळातही वैदिकांची ही लबाडीराजरोसपणे सुरु आहे.त्यातून समाजामध्ये दुफळी माजविली जात आहे.आपली शोषणशाही टिकून राहण्यासाठी सनातन्यांचा हा आटापिटा सुरु आहे.समाजहिताचा व्यापक विचार करुन बसवण्णांसारखे जगद्गुरु लिंगायत धर्माची जीवनदृष्टी देत असतात,पण बनावट पोथ्यापुराणांनाच खरे धर्मग्रंथ मानून लोक वस्तुस्थितीपासून दूर राहातात,त्यामुळे अवघ्या समाजाचेच नुकसान होत असते.अशा सर्व बाबींचा अभ्यासपूर्ण आढावा घेत लिंगायत हा स्वतंत्र धर्मच असल्याची ग्वाही देताना लेखकाने त्यासाठी प्रसिद्ध वचनांचे दाखले उद्धृत केले आहेत.अत्यंत जिव्हाळ्याचा विषय विलक्षण तळमळीने मांडताना त्याला अभ्यासपूर्णतेची जोड दिल्यामुळे ‘लिंगायत स्वतंत्र धर्मच’ हे पुस्तक कमालीचे वाचनीय झाले आहे.पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठ चित्रकार सुनील यावलीकर यांच्या कुंचल्यातून साकारले आहे.






**भरत यादव**
yadavbh515@gmail.com
9890140500

**पुस्तकाचे नावः लिंगायत स्वतंत्र धर्मच**
लेखकः चन्नवीर भद्रेश्वरमठ
प्रकाशकः प्रगती प्रकाशन,सोलापूर
पृष्ठसंख्याः १४४
देणगी मूल्यः २०० रू

## झेडपीची ही आहे शाळा..

झेडपीची ही शाळा आहे
शाळे मध्ये ’ शिक्षण ’ आहे
इकडे शिक्षण तिकडे शिक्षण
शिक्षण शिक्षण शिक्षण शिक्षण
आ शिकती ओ शिकती
...॥१॥

झेडपीची ही शाळा आहे
शाळे मध्ये ’’ खेळ ’’ आहेत
इकडे खेळ तिकडे खेळ
खेळं खेळं खेळं खेळं
खेळ खेळती खो खेळती ..
॥२ ॥

झेडपीची ही शाळा आहे
शाळे मध्ये ’’ गाणी ’’ आहेत
इकडे गाणी तिकडे गाणी
गाणीचं गाणी गाणीचं गाणी
गाणी म्हणती हो म्हणती ...
॥३ ॥

झेडपीची ही शाळा आहे
शाळेमध्ये ’’ गोष्टी ’’ आहेत
इकडे गोष्टी तिकडे गोष्टी
गोष्टीचं गोष्टी गोष्टीचं गोष्टी
गोष्ट ऐकती हो सांगती ....॥
४ ॥

झेडपीची ही शाळा आहे
शाळे मध्ये ’’ भोजन ’’ आहे
चविष्ट भोजन रुचकर भोजन
भोजन भोजन भोजन भोजन
भोजन करती हो करती ....॥
५ ॥

झेडपीची ही शाळा आहे
शाळे मध्ये ’’ गणवेश ’’ आहे
सुंदर गणवेश छानछान गणवेश
गणवेश गणवेश गणवेश गणवेश
गणवेश करती हो करती ....॥
६ ॥

झेडपीची ही शाळा आहे
शाळे मधे ’’ सुविधा ’’ आहेत
इकडे सुविधा तिकडे सुविधा
सुविधाचं सुविधा सुविधाचं
सुविधा
लाभ घेती हो घेती ..॥ ७ ॥

झेडपीची ही शाळा आहे
शाळे मध्ये ’’ आनंद ’’ आहे
इकडे आनंद तिकडे आनंद
आनंद आनंद आनंद आनंद
आनंदती बागडती .... ॥८ ॥ ।

झेडपीची ही शाळा आहे
शाळे मध्ये ’’ उपक्रम ’’ आहेत
इकडे उपक्रम तिकडे उपक्रम
उपक्रम उपक्रम उपक्रम उपक्रम
उपक्रम करती हो करती ....॥
९ ॥

झेडपीची ही शाळा आहे
शाळे मध्ये ’’ रचनावाद ’’ आहे
इकडे रचनावाद तिकडे रचनावाद
रचनावाद रचनावाद रचनावाद
रचनावाद शिकती हो शिकती ..
॥१० ॥

**हरिश्चंद्र खेंदाड**
( गडकाव्यांजलीकार)

# श्रावण महिन्यात..

**श्रावण** महिन्यात वारा झुळझुळ वाहतो या, झुळझुळ वाहतो या गाणं प्रितीच गातो या... धरती मातेला नटुन अशीच राहु दे, अशीच राहु दे, श्रावण रोजच येऊ दे.. हे स्व.दादा कोंडकेंच्या ’वाजवू का ?’ सिनेमातील गीत ऐकतांना कळत न कळत आपले मन ताल धरते आणि निसर्गाला साद घालू लागते. श्रावण महिना म्हणजे निसर्गाचा यौवनकाळ! डोंगर,मैदान अन् सारी सृष्टी हिरवा शालू नेसून नटलेली पाहताना डोळ्यांचे पारणे फिटून जात. श्रावण महिना हा तन,मन शुद्धतेचा अन् भक्ती–भाव जपण्याचा महिना होय.या महिन्यात असणारी सण उत्सवांची रेलचल आणि निसर्गाची कृपादृष्टी अनुभवताना मनात उमटणारे भावतरंग शब्दबद्ध करताना कवी, लेखक आणि लोककलावंतांच्या प्रतिभेला नवीन उमाळे फुटू लागतात. वी कुसुमाग्रज कवितेतून श्रावणाचे येतोचित वर्णन पुढीलप्रमाणे करतात.हासरा नाचरा, जरासा लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला तांबूस कोमल पाऊल टाकीत भिजल्या मातीत श्रावण आला मेघांत लावीत सोनेरी निशाणे आकाशवाटेने श्रावण आला लपत छपत, हिरव्या रानात, केशर शिंपीत श्रावण आला इंद्रधनुष्याच्या बांधित कमानी संध्येच्या गगनी श्रावण आला लपे ढगामागे, धावे माळावर, असा खेळकर श्रावण आलासृष्टीत सुखाची करीत पेरणी आनंदाचा धनी श्रावण आला एखादा पाळीव प्राणी पाळल्याप्रमाणे’श्रावण पाळणे’ असा एक वाक्यप्रचार जनसामान्यात रुढ झाला आहे. कोणी मांसाहार वर्ज करून श्रावण पाळतो, तर काही पुरुष मंडळी दाढी अन् केश कर्तन न करता या महिन्या पुरतं ’ वैराग्य ’ रूप धारण करून श्रावण पाळतात.श्रावण महिन्यात येणाऱ्या पंचमीच्या सणाला झुळझुळ वाहणाऱ्या वाऱ्याला साद घालणारे झोके बांधले जातात. नवविवाहित माहेरवाशीनी नांदून आलेला शिनवटा घालवण्यासाठी झोके खेळतात. मंगळागौरीचा फेर धरतात.आपल्या संस्कृतीत श्रावण महिना अत्यंत पवित्र समजला जातो. पुण्य प्राप्तीसाठी विविध वृत्तवैकल्य, उपासतापास आणि शिवमुठ सारख्या परंपरा



पाळल्या जातात. या महिन्यात पूजाअर्चा,भजन, आणि भक्ती गीत गायन यांना विशेष महत्त्व असतं. नगारा वाजून भगवान श्री शंकराला प्रसन्न केलं जातं. त्याच्या गळ्यातील नागदेवतेला नागपंचमी दिवशी पूजलं जातं. खरंतर आपले सारे सण हे निसर्गाशी संबंधित आहेत. पावसाळ्यात सर्रास सापांचं दर्शन आपल्याला होतं. अन्नसाखळीत इतर उपद्रवी प्राण्यांना आपले भक्ष बनवून,त्यांची संख्या संतुलित करणारा साप हा माणसाचा मित्रच आहे.जोपर्यंत आपणहून एखाद्या प्राण्याला दुखवत नाही किंवा मारण्याचा प्रयत्न करत नाही तोपर्यंत तो प्राणी आपल्यावर हल्ला करीत नाही.त्याला साप सुद्धा अपवाद नाही.जगामध्ये सुमारे २७०० प्रकारचे साप आढळतात. भारतात त्यापैकी २७८ जाती सापडतात.त्यात काही विषारी आहेत, काही सौम्यविषारी; तर बहुसंख्य बिनविषारी आहेत. महाराष्ट्रात एकूण ५२ जातीचे साप आढळतात. त्यात हाताच्या बोटांवर मोजण्याइतके साप विषारी आहेत. नाग, मण्यार, घोणस व फुरसे हे विषारी साप प्रामुख्याने अपल्या सभोवती आढळतात.यानंतर राहिलेले सगळेच बिनविषारी आहेत.उदाहरणार्थ धामण, गवत्या,तस्कर, अजगर, मांडूळ, दिवड, पट्टेरी पान सर्प , कुकरी इत्यादी.यानंतर विषारी आणि बिनविषारी यामध्ये मोडणारा सापांचा एक गट याला निमविषारी साप म्हणतात. जे चावले असता फक्त ५ ते ६ तास झोप येते. उदा. हरणटोळ व मांज्या है दोन साप या प्रकारात मोडतात. सापाबद्दल आपल्या समाजात अनेक गैरसमज आहेत. हे गैरसमज नागपंचमी सारख्या सणा दिवशी जनजागृती पर उपक्रम घेऊन दूर केले पाहिजेत. उदाहरणार्थ साप दूध पितो. तो डूक धरतो. मंत्र उच्चार, अंगारा धुपारा आणि जडीबुटींनी साप चावल्यास उतरवता येतो.श्रावण महिन्यात नारळी पौर्णिमा म्हणजेच राखी पोर्णिमा, गोकुळाष्टमी, बैलपोळा हे सण देखील उत्साहाने साजरे केले जातात. राखी पौर्णिमेला बहीण आपल्या भावाला मायेने राखी बांधते. नात्यात आलेला दुरावा दूर व्हावा म्हणून भाऊराया ओवाळणी देऊन तिला खुश करतो. वर्षभर राब राब राबणाऱ्या बैलाला बैलपोळ्याच्या दिवशी बळीराजा गावभर नटवून, सजवून वाजत गाजत मिरवून आणतो. त्याला पुरणपोळीचा नैवद्य चारतो. गोकुळाष्टमीच्या दिवशी उंचावर बांधलेली दहीहंडी मानवी मनोरे रचून फोडली जाते.असा हा श्रावण मास प्रियजनांशी प्राणीमित्रांशी आणि सभोवतालच्या बहरलेल्या निसर्गाशी आपले नाते दृढ करणारा आहे.



**किशोर जाधव,**
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

# चारित्र्य आणि प्रामाणिकपणा हेच मनुष्याचे खरे अलंकार

**सुंदर** दिसण्यासाठी सौंदर्य प्रसाधनांचा आणि दागिन्यांचा नुसता भडिमार सुरू आहे. महागडे सौंदर्य प्रसाधने आणि मौल्यवान दागिने खरेदी करुन व्यक्तिमत्त्व खुलवण्याचे रग्गड प्रयत्न सुरू आहेत. सोबतीला महागड्या व हायफाय कपड्यांची रेलचेल असते. एकीकडे असे अलंकाराने नटलेले लोक आहेत आणि दुसरीकडे कष्टाळू,चारित्र्यवान आणि प्रामाणिक लोक असतील तर यांच्यापैकी चारित्र्यवान व प्रामाणिक लोक जास्त सुंदर दिसतात. हे वाक्य कोणाला खटकले किंवा नाही आवडले तर काही हरकत नाही. परंतु, समाजाचे व देशाचे खरे भूषण चारित्र्यवान व प्रामाणिक लोक असतात. हे कोणी नाकारू शकत नाही. कितीही वाईट परिस्थिती ओढवली, कितीतरी संकटे आली तरीही हे प्रामाणिक लोक आपला स्वतःचा प्रामाणिकपणा सोडत नाहीत. यांना लबाडी, खोटारडेपणा, बनवाबनवी आणि हातचालाखी कधीच जमत नाही. सत्य बोलणे,सत्य वागणे, कष्टाची भाकर खाणे आणि चांगले विचार अंगिकारणे हीच यांची खरी संपत्ती असते.दिवसरात्र शेतात काम करणारे सर्व शेतकरी आणि देशाचे रक्षण करण्यासाठी तैनात असणारे आपले सैनिक हे दोघे इतर कोणत्याही व्यक्तीपेक्षा जास्त रुबाबदार दिसतात. यांचे व्यक्तीत्व अगदी लाजवाब असते. यांच्या प्रामाणिकपणाची इतर कोणी बरोबरी करू शकत नाही. चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष आणि प्रामाणिक नागरिक हे प्रत्येक देशाची खरी संपत्ती असते. याच अनुषंगाने भारताचा सच्चा नागरिक या नात्याने इतर नागरिकांना सांगावे वाटते की, मी चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष आणि प्रामाणिक माणूस असल्याचा मला सार्थ अभिमान आहे असे प्रत्येक भारतीय नागरिकाला वाटले पाहिजे आणि त्यात सत्यता असली पाहिजे. मग खरी कसोटी अशी की आपल्यापैकी किती जणांना चारित्र्य, कर्तव्य आणि प्रामाणिकपणा ही नितीमुल्ये आवडतात? यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने आत्म परीक्षण करण्याची नितांत गरज आहे. किती राजकारणी, किती नोकरदार, किती उद्योगपती, किती व्यापारी, किती शिक्षक, किती खेळाडू, किती कलाकार हे चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष आणि प्रामाणिक आहेत?हे ज्याने त्याने ठरवावे. अट एकच आहे की, कोणी कोणाकडे बोट दाखवण्याची गरज नाही. स्वतःच्या अंतःकरणात डोकावून स्वतःला विचारायचे खरंच मी प्रामाणिक आहे? खरंच मी चारित्र्यवान व कर्तव्यदक्ष आहे? असे स्वतःला विचारण्याची हिंमत असेल तर आपण आपल्या मधील दुर्गुण नक्की कमी करू शकतो. माझे आईवडील,माझे शिक्षक आणि माझे काही गावकरी हे बावन्नकशी सोन्यासारखे अतिशय प्रामाणिक,कष्टाळू,चारित्र्यवान आणि गुणवान होते आणि आहेत. त्यांचा आदर्श घेऊन मी सुद्धा त्यांच्याप्रमाणेच बनण्याचा प्रयत्न करत आहे.कारण ही किमया माझ्यावर झालेल्या संस्कारांची आहे.कदाचित माझ्या पेक्षा जास्त कोणी इतर माणसे प्रामाणिक असू शकतात,कोणी जास्त कर्तृत्ववान असू शकतात व कोणी चारित्र्याला जीवापाड जपणारे असू शकतात. तेव्हा मी त्यांचा तिरस्कार न करता त्यांचा आदर्श घेण्याचा प्रयत्न करत राहणार अशी भावना असली पाहिजे.आपले सगळे संत,महात्मे, महापुरुष,थोर समाजसुधारक आणि विचारवंत हे अतिशय चारित्र्यवान,कर्तृत्ववान,प्रामाणिक आणि मानवतावादी विचारांचे पाईक होते.त्यांनी त्यांच्या प्रभावी कार्याने समाजसुधारणा करण्याचे काम केले आहे.म्हणून आज आपल्या वाट्याला शिक्षण,विचार व चांगले जीवन आले आहे.म्हणून आपण नेहमीच आपल्या महामानवांच्या ऋणात राहणार आहोत.भारतात लोकशाही राज्यव्यवस्था आहे. आजच्या राजकारणी लोकांचे कारनामे व त्यांच्या बोलण्याचे मनसुबे पाहिले असता असे दिसून येत आहे की भारतात लोकशाही राज्यव्यवस्था धोक्यात आली आहे अशी चर्चा रंगत आहे पण उघड उघड बोलायला कोणीही धजावत नाही. प्रत्येक निवडणुकीत आपण आपले अमूल्य मत विकणार असू तर आपण लोकशाही बद्दल न बोललेच बरे!तात्पर्य एवढेच की सामाजिक, सांस्कृतिक आणि इतर कोणताही कार्यक्रम चालू असलेल्या व्यासपीठावर उपस्थित मान्यवर मंडळींमध्ये जो कोणी प्रामाणिक, चारित्र्यवान आणि ज्ञानसंपन्न असेल तर सगळ्या श्रोत्यांना तो माणूस खराखुरा सुंदर दिसतो, उठावदार दिसतो.इतरांचा भंपकपणा ठसठशीत दिसतो. यावरून हेच अधोरेखित करायचे आहे की चारित्र्य आणि प्रामाणिकपणा हेच मनुष्याचे खरेखुरे अलंकार आहेत!



**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

# वेळेचे व्यवस्थापन

**’मला वेळच** मिळाला नाही मला वेळेअभावी काही शक्य झाले नाही अशी वाक्ये आपल्या कानावर पडतात. खरं तर वेळ ही सगळ्यांना सारखीच मिळालेली असते.म्हणजे प्रत्येक व्यक्तीला चोवीस तासच मिळतात. जी माणसे वेळेचे योग्य व्यवस्थापन करतात अशी माणसे आयुष्यात यशस्वी होतात.प्रत्येक तासाचे त्यांचे नियोजन असते.त्यानुसार आपले काम करत असतात.यामुळे अशी माणसे आपल्या इच्छित ध्येयापर्यंत पोहचतात.वेळ मिळत नाही अशी सबब त्यांच्याकडे नसते.प्रत्येक मिनिट उपयोगी पडला पाहिजे याचा त्यांचा विचार असते.यासाठी प्रत्यक्ष कृती करुन अंमलबजावणी करतात.म्हणून तर ते यशस्वी झालेले दिसतात.प्रत्येकाच्या



आयुष्यातील मिळालेला वेळ अत्यंत महत्वाचा आहे.जगात जेवढे लोक यशस्वी झाले आहेत किंवा आपपल्या क्षेत्रात कर्तृत्वाच्या जोरावर नाव कमावलेले अशा लोकांनी वेळेचे योग्य व्यवस्थापन केले असल्याचे दिसून येते.काही लोकांना वेळ कसा घालवावा हा प्रश्न पडतो तर काही लोकांना काम करण्यास वेळ अपुरा पडतो.म्हणजे सर्व काही माणसांवर अवलंबून असते. सकाळी केव्हा उठायचे, कोणत्या वेळी कोणती कामे करायची , दिवसभराचे सूक्ष्म नियोजन ज्याच्याकडे असते. अशा व्यक्ती लवकर यशस्वी होतात. त्यांच्याकडे मिळालेला वेळ आणि करावयाची कामे यांचे नियोजन तयार असते.अशा व्यक्ती आनंदी प्रसन्न आणि कामात व्यस्त दिसतात.अशा व्यक्तींनी स्वतः ला एवढे तयार केलेले असते की त्या त्या वेळेला त्यांची कामे होतात. शालेय विद्यार्थ्यांना वेळेचे व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे असते. झोप,व्यायाम,शाळा, अभ्यास,खेळ, इत्यादी गोष्टींसाठी किती वेळ द्यायचा याचे नियोजन करणं आवश्यक आहे. याचा फायदा असा आहे की तुमच्या नियोजनाप्रमाणे सगळ्या गोष्टी तुम्हाला करता येतात.तुमच्या मनावर ताण किंवा दडपण येत नाही.तुम्ही आनंदी राहता. तुमचा आत्मविश्वास वाढतो.शैक्षणिक संपादणूकीमध्ये वाढ होते.ज्यांच्याकडे वेळेचे नियोजन नाही अशा मुलांना अडचणी निर्माण होतात.मग अशा मुलांचा अभ्यास पूर्ण होत नाही.कोणतीच गोष्ट त्यांची व्यवस्थित होत नसल्याने आत्मविश्वास कमी होतो.परिणामी अशा मुलांची प्रगती अपेक्षित अशी होत नाही. ज्या मुलांनी स्वतः च वेळेचे नियोजन केले आहे.त्याप्रमाणे त्यांचा दिवसभराचा दिनक्रम पूर्ण होतो.शैक्षणिक प्रगती उत्तम होते.प्रत्येक व्यक्तीने वेळेचे काटेकोरपणे नियोजन केले तर अनेक गोष्टी साध्य होतात.आपली कामे मार्गी लागतात. समाजात एक वेगळी प्रतिमा तयार होते.

**लक्ष्मण जगताप**
बारामती

## माय

कसे पानावले डोळे
कुठे उणीव राहिली
माय पिलांच्या शोधात
हृदयांत घायाळली

घालं मेल जीवा शिवा
नाही कुसं उजवली
कशी दुष्टांची नजर
जिवा तान्ह्यास लागली

रणरागिनी असे तू
सारं जग समाधानी
नको फिरूस उन्हामंदी
अशी तू ग आणवानी

चढ उतार जिवाचा
सोप्या चढणी चढावे
दुःख बाजूला सारता
मर्दावाणी तू जगावे

माया करूणा पाहिली
भरलेल्या आसवांत
खंत शब्दात मांडीली
भूमी लेखनी काव्यात.

मातृ हृदयी

**भूमिपुत्र वाघ**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संमिश्र

रविवार,दि. 27 जुलै 2025



# सर्वदूर झालेल्या पावसामुळे शेतकरी आनंदी; भूम तालुक्यातील खरीप पिकांना संजीवनी

## आरसोली तलाव तुडुंब भरल्यामुळे भूम आणि वाशी शहराचा पाणीप्रश्न मिटला





दत्ता अहिरे | आरंभ मराठी

**भूम**–तालुक्यात अनेक दिवसांच्या विश्रांती नंतर पावसाने जोर धरल्याने हाता तोंडाशी आलेला घास पुन्हा शेतकऱ्याच्या पदरात पडणार असून शेतकरी खरिपाच्या पिकापासून चिंतामुक्त झाला आहे. तालुक्यात खरिपाच्या पिकामध्ये प्रामुख्याने सोयाबीनचा पेरा मोठ्या प्रमाणावर झाला आहे. पेरणीनंतर पिके जोमात आली असतानाच पावसाने एक महिना पाठ फिरवल्याने आलेली पिके जाण्याच्या मार्गावर होती. शेतकरी पावसाची वाट पाहत बसला होता. अशातच गेल्या तीन दिवसापासून कमी जास्त प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हसू दिसून येत आहे. सोयाबीन पीक नगदी असल्याने सोयाबीन पिकावर शेतकऱ्यांचे वर्षभराचे आर्थिक नियोजन अवलंबून असते. आत्ता झालेल्या पावसाने खरिपाची पिके जोमात येणार आहेत.

### शेतशिवार हिरवागार, हिरव्या चाऱ्याचा प्रश्न मिटला

तालुक्यात सुरुवातीला अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणात झाला होता तेव्हा पासूनच जनावरांच्या चाऱ्याची ऊगवन झाली होती. तालुक्यात दुग्ध व्यवसाय जास्त असल्यामुळें पशुपालकांना चारा लागवड करावा लागतो. खरीप हंगामामध्ये वाऱ्याची लागवड केली जात नसल्याने पशुधनाला साठी शेतकऱ्यांना गवती चाऱ्याचा आधार घ्यावा लागतो. मुसळधार पावसाने चाऱ्याची झपाट्याने वाढ होणार असून पशुपालकांना मोठा आधार मिळणार आहे.

### पाणी पातळी वाढली

भूम तालुक्यात गेल्या तीन दिवसापासून संततधार पाऊस पडत असल्याने तालुक्यातील रामगंगा, बानगंगा, संगमेश्वर, आरसोली येथील प्रकल्पामध्ये चांगला पाणीसाठा झाला असून नदी नाले खळखळून वाहु लागले आहेत. त्याचबरोबर वाशी–भूम शहरास पाणीपुरवठा असणारा आरसोली प्रकल्प पूर्ण भरला आहे. तालुक्यातील विहिरी काटोकाट भरलेल्या असून इंधन विहिरी चे पाणी वाढले आहे. शेतीसाठी लागणारे पाणी त्याचबरोबर पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेच्या पाण्याचा प्रश्न मिटला आहे. तालुक्यात एकूण ६२% पेरणे योग्य क्षेत्रावर पेरणी झाली असून यामध्ये प्रामुख्याने सोयाबीन, उडीद ,तूर,असे खरीप पिके घेतली गेली आहे जवळपास ५०% पेरा सोयाबीनचा झाला आहे.

### उसाचे क्षेत्र वाढले

भूम तालुक्यात गतवर्षी शेतकऱ्यांनी आपले ऊसाचे खोडवे मोडले होते. परंतु, यावर्षी पुन्हा नव्याने ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ऊस वाढी साठी देखील झालेला पाऊस उपयुक्त झाला असून, उसाची वाढ व वजनात वाढ होणार असल्याने ऊस उत्पादक शेतकरी देखील आनंदी झाला असल्याचे दिसून येते. भूम शहर व वाशी शहराला पाणीपुरवठा करणारा आरसोली येथील तलाव शनिवारी दुपारनंतर वाहू लागल्याने परिसरातील शेतकरी समाधानी झाले आहेत.

# कंत्राटी वीज कामगारांचे चार दिवसांपासून उपोषण

## एजन्सीकडून कामगारांचा आर्थिक आणि मानसिक छळ होत असल्याचा आरोप




आरंभ मराठी | धाराशिव

वीज वितरण कंपनीतील कंत्राटी कामगारांचा एजन्सीकडून आर्थिक आणि मानसिक छळ होत असल्याचा आरोप करत कंत्राटी कामगारांनी मागील चार दिवसांपासून महावितरण च्या मुख्य कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. महावितरण कंपनीमध्ये रिक्त जागेवर अनेक वर्षांपासून कंत्राटी कामगारांची नियुक्ती केली जाते. हे कामगार नियमित कामगाराप्रमाणे महावितरणचे काम करतात. पण या कामगारांना नियमित कामगारांप्रमाणे न्याय मिळत नाही असा कंत्राटी कामगारांचा आरोप आहे. कंत्राटी कामगारांच्या प्रश्नावर अधीक्षक अभियंता संजय आडे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर व व्यवस्थापक दिलीप पाटोळे यांच्यासमवेत बैठक घेऊन वीज कंत्राटी कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, त्यावर तोडगा निघाला नाही. धाराशिव जिल्ह्यात सध्या तीन एजन्सीमार्फत कंत्राटी कामगारांची नियुक्ती केली जाते. यामध्ये विद्युतसागर संस्था, अंबाजोगाई, मे.आकाश इलेक्ट्रिकल, बीड आणि मे.पटले कॉन्ट्रॅक्टर, नागपूर यांचा समावेश आहे. या तीनही एजन्सीकडून कंत्राटी कामगारांची आर्थिक व मानसिक पिळवणूक केली जात असल्याचा कामगारांचा आरोप आहे. याबाबत अधीक्षक अभियंता यांना वेळोवेळी माहिती देऊनही त्यांनी एजन्सीला समज दिलेली नाही असाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाहीत तोपर्यंत उपोषण सोडणार नाही अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. आंदोलकांनी जुन्या, अनुभवी व न्यायालयीन संरक्षित कंत्राटी कामगारांना प्राधान्याने नियुक्ती आदेश द्यावे, वेतन वाढीतील फरक हा कामगारांच्या खात्यावर जमा करावा, एजन्सीकडून होत असलेली पिळवणूक थांबवावी, सर्व कामगारांचे ईएसआयसी कार्ड कौटुंबिक माहितीसह मिळावे, सेवाजेष्ठतेप्रमाणे वीज कंत्राटी कामगार कामावर ठेवण्यात यावेत, कामगारांचे कामाचे ठिकाण व राहण्याचे ठिकाण यात ५ ते ७ किमी चे अंतर राहावे या मागण्या करण्यात आल्या आहेत. आंदोलकांच्या उपोषणाचा आज पाचवा दिवस असून, यावर अजूनही तोडगा निघालेला नाही.

# पत्रकाराला धमकी दिल्याप्रकरणी मुरुम शहर पत्रकार संघाचे पोलिसांना निवेदन

## बातमीत नाव न दिल्याच्या कारणावरून पत्रकाराला शिवीगाळ, जीवे मारण्याची धमकी

आरंभ मराठी | मुरूम

मुरुम शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष रामलिंग काशिनाथ पुराणे यांना बातमीत नाव का दिलं नाही म्हणून तुगाव (ता. उमरगा) येथील भालचंद्र अंकुश लोखंडे या व्यक्तीने अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची व खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. यासंदर्भात मुरुम शहर पत्रकार संघटनेने शनिवारी (ता.२६) मुरुम पोलीस ठाण्यात निवेदन सादर करत, संबंधित आरोपीवर पत्रकार संरक्षण कायदा आणि आयपीसी कलम ांनुसार कठोर कारवाई करण्याची मागणी केली. निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार रामलिंग पुराणे यांनी २५ जुलै रोजी तुगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या उद्घाटनाची बातमी प्रसिद्ध केली होती. सदर बातमीत नाव न दिल्याच्या कारणावरून लोखंडे यांनी त्यांना अत्यंत अश्लील भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याचा दम दिला. तसेच खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली आहे. पत्रकार संघाच्या निवेदनात हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की,




''पत्रकारांचे काम बातमी गोळा करणे, सत्य मांडणे आणि जनतेपर्यंत पोहोचवणे हे आहे. अशा धमक्या म्हणजे पत्रकारितेवरचा थेट हल्ला आहे.'' संबंधित व्यक्तीची राजकीय पार्श्वभूमी असल्याने अशा धमक्या देऊन पत्रकारांना गप्प बसवण्याचा प्रकार सुरू असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर मोहन जाधव, नहीरपाशा मासुलदार, अजिंक्य मुरुमकर, रफिक पटेल, रवी अंबुसे, राजेंद्र कारभारी, हुसेन नुरसे, इम्रान सय्यद, लखन भोंडवे व इतर पत्रकार बांधवांच्या सह्या आहेत. पत्रकारांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर तातडीने कठोर पावले उचलली नाहीत, तर संघटनेतर्फे अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी शिवसेना (उबाठा) पक्षात इनकमिंग वाढले

## तौफिक काझी,इरफान शेख यांच्यासह शेकडो तरुणांचा पक्षप्रवेश

आरंभ मराठी | धाराशिव

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असतानाच शिवसेना (उबाठा) पक्षात मोठ्या प्रमाणात इनकमिंग वाढले आहे. शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या ज्वलंत विचारांनी प्रेरित होऊन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवा सेनेचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षप्रवेश होत आहेत. धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार कैलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव शहरातील ख्वॉजा नगर येथील तौफिक काझी, इरफान शेख यांच्यासह शेकडो मुस्लिम तरुणांनी शिवसेना पक्षात शुक्रवारी (दि.२५) जाहीर प्रवेश केला. दरम्यान, तौफिक काझी यांच्यावर शिवसेना अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्षपदाची तर इरफान शेख यांच्यावर अल्पसंख्याक विभागाच्या धाराशिव शहराध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली. या प्रवेशामुळे शिवसेनेमध्ये नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून अनेक तरुणांनी मोठ्या संख्येने शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश करण्याचा निश्चय




व्यक्त केला आहे. आमदार तथा जिल्हाप्रमुख कैलास पाटील यांच्या हस्ते शिवसेना (ठाकरे) चे धाराशिव कळंब–विधानसभा अध्यक्ष शौकत शेख व युवा नेते अबरार कुरेशी यांच्या नेतृत्वाखाली व ख्वॉजा नगर येथील शेकडो तरुणांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी शिवसेना धाराशिव शहरप्रमुख सोमनाथ गुरव, कळंब तालुकाप्रमुख सचिन काळे, पंकज पाटील, जिल्हा समन्वयक दिनेश बंडगर, कलीम कुरेशी, छोटा साजिद अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष तौफिक काझी, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष इरफान उर्फ इब्राहिम शेख यांच्यासह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी असलम युसुफ शेख, बबलू पठाण, एजाज काझी, एजाज मुजावर, जावेद शेख, मजहर पठाण, लाला शेख, जैनु शेख, नयूम शेख, मोहसीन शेख, अरबाज शेख, अम्मर शेख, मुन्ना मुलाणी, सलमान शेख, बिलाल शेख यांच्यासह शेकडो तरुणांनी जाहीर प्रवेश केला.

# येणेगूर येथे महादेव व श्री गणेश मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा उत्साहात


## विविध धार्मिक कार्यक्रमांनी मंडळाचा रौप्य महोत्सव साजरा

आरंभ मराठी | येणेगूर

उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील बलरामनगर परिसरात श्री महादेव व श्री गणेश मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन मोठ्या भक्तिभावात व उत्साहात पार पडले. तीन दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्याला गावकऱ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. या प्रसंगी बलरामनगरातील नव्याने उभारलेल्या मंदिरात भव्य सजावट करण्यात आली होती. दिनांक २३ जुलै रोजी दुपारी ३ वाजता मूर्ती आणणे श्री करिबसवेश्वर मठात धान्य दिवस, तैल दिवस व २४ जुलै रोजी सकाळी श्री करिबसवेश्वर मठ येथून महादेव व गणेश मूर्तींचा मिरवणुकीने आगमन करण्यात आले. कुंभकलश सोबत टाळ मृदुंगाच्या गजरात, महिला व लहानथोर मंडळींच्या उपस्थितीत भव्य मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी श्री शंभुलिंग शिवाचार्य महाराज पडसलगी व श्री गंगाधर महास्वामी जेवळी यांच्या प्रवचन सेवा व भजनी कार्यक्रम संपन्न झाला. २५ जुलै रोजी पहाटे धार्मिक विधीनुसार होम–हवन व पूजा विधी पार पडले. श्री म.नि.प्र. मृगेंद्र महास्वामी (कासारशिरसी मठ),



सुत्रेश्वर शिवाचार्य महास्वामी (अचलेर) व शिवयोगी शिवाचार्य महास्वामी (अणदूर) यांच्या शुभहस्ते श्री महादेव व श्री गणेश मूर्तींची प्राणप्रतिष्ठा विधीपूर्वक करण्यात आली. सायंकाळी दीपप्रज्वलन सोहळा पार पडला. या कार्यक्रमास माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, आमदार प्रविण स्वामी, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष सुरेशदाजी बिराजदार यांची उपस्थिती लाभली. यानंतर महाप्रसाद कार्यक्रम संपन्न झाला. तसेच मंडळातील सदस्य देवराज बिराजदार,अमोल स्वामी,अनिल संगशेट्टी, सिद्धेश्वर हलमडगे,सचिन स्वामी,संगप्पा बादुले,मल्लिनाथ थाटे, मदार भालके,सिराज मुन्शी,अल्ताफ तांबोळी,गणेश जोजन,उमेश धामशेट्टी,वैभव हिप्परगे,ओमकार संगशेट्टी,या संपूर्ण आयोजनात बलराम गणेश मंडळातील सदस्य, बलराम महिला भजनी मंडळ, विठ्ठल भजनी मंडळ तसेच गावातील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



### रौप्य महोत्सवानिमित्त धार्मिक उन्नतीची पायरी गाठली

२००१ साली केवळ १००० रुपये शिल्लक निधीतून बलराम गणेश मंडळाची स्थापना केली होती. आज २५ वर्षांनंतर बलराम गणेश मंडळाच्या सहकार्याने सुमारे २५ लाख रुपये निधी गोळा करून महादेव व गणेश मंदिरासह भव्य सभामंडप उभारण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणले. रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने ही सामाजिक व धार्मिक उन्नतीची पायरी आम्ही सर्व ग्रामस्थांनी मिळून गाठली आहे. बलराम महिला भजनी मंडळाच्या स्थापनेमुळे हा उत्सव अधिक भावपूर्ण झाला.''

**दयानंद संगशेट्टी**
प्रमुख, बलराम गणेश मंडळ.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ढोकी येथे ६४ दात्यांचे रक्तदान

आरंभ मराठी | ढोकी

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये ६४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विधायक उपक्रम राबविण्याचा निर्णय भारतीय जनता पक्षाच्या वतीने घेण्यात आला. राणाजगजीतसिंह पाटील व जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विधायक उपक्रमाचा भाग म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये करण्यात आले होते. धाराशिव येथील सह्याद्री ब्लड बँकेच्या वतीने रक्त संचय करण्यात आला. या शिबिरामध्ये ६४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी बाजार समितीचे सभापती राजाभाऊ पाटील, खरेदी विक्री संघाचे चेअरमन उद्धव पाटील, मजूर फेडरेशनचे माजी चेअरमन गफार काझी, खरेदी–विक्री संघाचे संचालक अनंतराव देशमुख, बाजार समितीचे संचालक निहाल काझी, तालुकाध्यक्ष अनिल भुतेकर, तालुका उपाध्यक्ष प्रमोद देशमुख, झुंबर बोडके, गुणवंत देशमुख, विश्वजीत लंगडे,शहराध्यक्ष प्रभाकर गाढवे, सुनील शिंदे,अंकुश जाधव, तानाजी माळी, गुणवंत सुतार, काका पाटील,राहुल वाकुरे,पंकज देशपांडे, सचिन लोमटे, अरुण डोलारे, दत्ता तिवारी, लहू शिंदे, शंकर क्षीरसागर, संजय पवार यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# कुरेशी समाजाच्या वतीने नळदुर्ग येथे विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन

आरंभ मराठी | नळदुर्ग

कुरेशी समाजाच्या पारंपरिक व्यवसायातील अडथळे थांबण्यासाठी त्वरित निर्णय घेणे, गोरक्षकांकडून होत असलेली अडवणूक व कायदा हातात घेत होणारी लुटमार, अत्याचार ताबडतोब बंद करण्यासाठी नळदुर्ग येथे कुरेशी समाजाच्या वतीने अप्पर तहसील कार्यालय समोर शुक्रवारी (दि.२५) धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी शासनाकडून मुद्दाम अल्पसंख्याक व दलित समाजास लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करत शेतकरी, व्यापारी यांच्या विरोधात शासन काम करत आहे. त्याविरुद्ध आम्ही संघटितपणे लोकशाही मार्गाने लढा उभा करू



असा निर्धार उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केला. यावेळी अपर तहसीलदार प्रमोद गायकवाड यांना देण्यात आले. या धरणे आंदोलनात माजी नगराध्यक्ष मुश्ताक कुरेशी, शहेबाज काजी, हाजी गफूर कुरेशी, आलेम मोहम्मद रजा, हसन कुरेशी, हुसेन कुरेशी,शिवाजी गायकवाड, अरूण लोखंडे,बरकत कुरेशी,एकबाल कुरेशी, मुजम्मिल कुरेशी, जैनुल आबेद्दीन कुरेशी, आमेर शेख, गौस कुरेशी, वसीम कुरेशी, बाबासाहेब बनसोडे, लखन गुंडवे, राजेंद्र शिंदे,मकसुद कुरेशी यांच्यासह हिंदू मुस्लिम समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव

रविवार,दि. 27 जुलै 2025

# धाराशिवकरांना नाहक त्रास कशासाठी?, आमदार कैलास पाटील यांनी आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना झापले

आरंभ मराठी | धाराशिव





शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून, पथदिवे बंद आहेत. कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, भुयारी गटार अशा मूलभूत सुविधा देताना राजकीय कुरघोड्या केल्या जात आहेत. राजकारणाचा फटका सामान्य नागरिकांना बसू नये याची काळजी प्रशासनाने घ्यावी अशा सूचना करताना बेजाबदारपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना आमदार कैलास पाटील यांनी आढावा बैठकीत सुनावले. आमदार कैलास पाटील यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.यावेळी अधिकाऱ्यांनी नागरी समस्याकडे गांभीर्याने पाहण्याच्या सूचना आमदार पाटील यांनी दिल्या.बैठकीला जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, तहसीलदार मृणाल जाधव, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक ढेंगळे पाटील महाविकास आघाडीचे माजी नगरसेवक, प्रतिनिधी उपस्थित होते. शहरातील रस्त्यांबाबत आमदार पाटील म्हणाले, रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे असून १४० कोटीच्या कामाची फेरनिविदेची प्रक्रिया सुरु होण्याबाबत तत्काळ कार्यवाही करावी, दुसरीकडे नियोजन समितीच्याही कामाना स्थगिती आहे. त्यामुळे आपल्या स्तरावरून त्याबाबत पाठपुरावा करावा अश्या सूचना आमदार पाटील यांनी केल्या.राजकीय कुरघोडी करताना जनतेचे हाल होणार नाहीत याची काळजी अधिकाऱ्यांनी घ्यावी असं आमदार पाटील यांनी सांगितले. शहरातील पथदिव्यांचा दुरुस्ती करणे हे नगरपालिकेचे काम आहे. कंपनी व त्याचा करार ही कारणे किती दिवस जनतेला सांगणार आहात, सण उत्सवाच्या दिवसात शहरात अंधार होणार नाही यासाठी पालिकेच्या स्तरावर दिवाबत्ती खरेदीची सोय करावी.तुंबलेल्या गटारी, नालेसफाई होत नसल्याने शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसत आहेत. नालेसफाईच काम या कंपनीला होत नसेल तर त्याच्याकडून हे काम काढून घेऊन नवीन कंत्राट काढा. यामध्ये प्रभागनिहाय निविदा काढता येत असतील तर ते अधिक योग्य होऊन हा प्रश्न मार्गी लागेल याबाबत लवकर निर्णय घ्या असा आदेश आमदार पाटील यांनी दिला. पावसाळ्याचे दिवस असल्याने रस्त्यावर जिथं आवश्यक आहे तिथं फक्त मुरुम टाकून भागणार नाही. मुरुम टाकून त्याची दबई करून कामाच्या ठिकाणी जिओ टॅगची अट टाका अन्यथा दरवेळीप्रमाणे पुन्हा निकृष्ट काम होतील. सर्व कामे दर्जेदार झाली असतील तरच बिल काढावी अन्यथा ती कामे पुन्हा व्यवस्थित करण्यास सांगावी. कचरा डेपोबाबत पालकमंत्री यांनी दिलेल्या साडेचार कोटीच्या बायोमायनिंग प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे, अशी विचारणा करून तातडीने त्याची प्रक्रिया पार पाडण्याच्या सूचना आमदार पाटील यांनी दिल्या. नागरी समस्या सोडविण्यासाठी कुणाची अडचण आहे. नागरिकांतून तीव्र रोष दिसत असतानाही काहीच होत नाही. यापुढे हे खपवून घेणार नसल्याचा इशारा अधिकाऱ्यांना दिला.आमदार पाटील यांनी संबंधित विभागांना कामे वेळेत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करून हलगर्जी ठेकेदारांना काळ्या यादीत टाका, असे आदेश यावेळी दिले.

# वाशी येथील आयटीआयमध्ये शहिदांना वंदन करत कारगिल विजय दिन साजरा



आरंभ मराठी | वाशी

वाशी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शनिवारी (दि.२६) 'कारगिल विजय दिवस' मोठ्या उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला. १९९९ साली कारगिल युद्धात भारतीय सेनेने टायगर हिलवर मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाच्या स्मरणार्थ हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डी. आर. वाघमारे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सौदागर बामणे, विशेष अतिथी म्हणून वीर माजी सैनिक सावंत साहेब, तर प्रमुख वक्ते म्हणून गणेश देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टी एच शेख यांनी केले. या कार्यक्रमात संस्थेतील विविध व्यवसायातील उत्कृष्ट विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. प्रमुख वक्ते गणेश देशमुख यांनी आपल्या भाषणात भारताच्या शौर्यपूर्ण इतिहासाचा वेध घेतला. त्यांनी पोरस, बप्पा रावल, महाराणा प्रताप, पृथ्वीराज चव्हाण, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, बाजीराव पेशवे यांच्यापासून ते स्वातंत्र्य संग्रामातील महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, सावरकर, भगतसिंग, राणी लक्ष्मीबाई यांच्यापर्यंत आणि कारगिल युध्दातील कॅप्टन विक्रम बत्रा, ग्रेनेडियर योगेंद्र सिंह, शैतान सिंह, सुभेदार जोगिंदर सिंह या वीर शूरवीरांचे स्मरण करून उपस्थितांमध्ये देशभक्तीचा जाज्वल्य अभिमान जागवला.

कार्यक्रमाचा समारोप कांबळे सरांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

## बाळासाहेब जगदाळे यांचे निधन



**धाराशिव –** येथील तांबरी विभागातील रहिवासी व एस टी महामंडळातील कर्मचारी बाळासाहेब बब्रुवान जगदाळे (वय ५७ वर्षे)यांचे शनिवारी (दि.२६) पहाटे दोन वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर धाराशिव येथील कपिलधार स्मशानभूमीत शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, दोन बहिणी, एक भाऊ असा मोठा परिवार आहे.

## शासकीय आयटीआयमध्ये कारगिल विजय दिन

**परंडा–**इतिहास वाचणे सोपे असते पण घडविणे खूप अवघड असते असे प्रतिपादन शिल्प निदेशक नितेश फाळके यांनी कल्याणस्वामी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था परंडा येथील कारगिल विजय दिवसाच्या आयोजित कार्यक्रमात केले. कौशल्य विकास, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री माननीय मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून शौर्याचा दिवस आणि वीरांना अभिवादन करण्याचा दिवस म्हणून कारगिल विजय दिवस शनिवारी (दि.२६) साजरा करण्यात आला.

# तुळजाभवानी मंदिरात लाडू प्रसाद सेवेचा जिल्हाधिकारी व महंतांच्या हस्ते शुभारंभ

## प्रसादाची किंमत जास्त असल्यामुळे भाविकांची नाराजी



आरंभ मराठी | तुळजापूर

तिरुपती बालाजी व शिर्डीच्या धर्तीवर तीर्थक्षेत्र तुळजापुरात तुळजाभवानी मंदिर संस्थान तर्फे भाविकांसाठी लाडू प्रसाद सेवेचा शुभारंभ शुक्रवारी (दि.२५) करण्यात आला. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व देवीचे महंत वाकोजी बुवा यांच्या हस्ते या सेवेचा शुभारंभ करण्यात आला. भाविकांना प्रसाद म्हणून हा लाडू मिळणार असून यासाठी भाविकांना ३० रुपये शुल्क द्यावे लागणार आहे. सेवेच्या शुभारंभानिमित्त चितळे परिवाराकडून १००० लाडूचे भाविकांना मोफत वाटप करण्यात आले. या लाडू वाटपासाठी मंदिर परिसरात तीन काउंटर सुरू करण्यात आले असून, प्रत्येक लाडूचे वजन ५० ग्रॅम असणार आहे. यासाठी भाविकांना ३० रुपये शुल्क द्यावे लागणार आहे. भाविकांचा प्रतिसाद बघून लाडू तयार करण्यात येणार असून सुरुवातीच्या तीन महिन्यापर्यंत पुणे येथून लाडू प्रसाद तयार करून तुळजापूर येथे आणण्यात येणार आहेत. त्यानंतर हा लाडू प्रसाद तुळजापूर येथे तयार करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली. यावेळी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश अहिरराव, व्यवस्थापक अरविंद बोळंगे, तिन्ही पुजारी मंडळाचे अध्यक्ष, मंदिर संस्थांनचे कर्मचारी व भाविक उपस्थित होते.

### पाकिटावरील माहिती इंग्रजीतून

या लाडू प्रसादाची एक्सपायरी डेट ही पाच दिवसाची असणार आहे. या लाडू प्रसादाच्या पाकिटावरील माहिती ही इंग्रजी मधून देण्यात आली असून, तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येणारे भाविक हे मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील त्यामुळे यावरील माहिती मराठी भाषेमध्ये छापण्याची गरज आहे.

### श्रद्धा स्वस्त पण प्रसाद महाग

तुळजाभवानी मंदिरात सुरू झालेला लाडू प्रसाद सेवा हा एक चांगला उपक्रम असला तरी प्रत्येक लाडू पाकिटाची किंमत तीस रुपये असल्याने अनेक भाविकांच्या खिशाला चटके देणारे ठरत आहे. विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल भाविकांमध्ये याबाबत नाराजीचा सूर ऐकायला मिळत आहे.

### पेढा व्यवसायावर होणार परिणाम



तुळजापूर शहरात मोठ्या प्रमाणावर पेढा व्यवसाय असून यावर अनेकांची उपजीविका अवलंबून आहे. शहरामध्ये पेढ्याच्या चार भट्ट्या असून लाडू प्रसादामुळे या पेढा व्यवसायावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यवसायिक व्यक्त करत आहेत.

# तुळजापूरमध्ये अनाथ, वंचित विद्यार्थ्यांना छत्री वाटपः अल्पोपहाराचेही वाटप

आरंभ मराठी | तुळजापूर



''अनाथांचा नाथ एकनाथ'' या भावनिक आणि सेवाभावी संकल्पनेवर आधारित शिवसेना तालुका व शहर शाखेच्या वतीने तुळजापूर शहरात एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत जय तुळजाभवानी माता शाळेतील अनाथ आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांना छत्री वाटप करून त्यांच्या शिक्षणप्रवासात थोडीशी मदत देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमात शंभरहून अधिक विद्यार्थ्यांना छत्रीचे वाटप करण्यात आले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शाळेत येताना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन या उपक्रमाची आखणी करण्यात आली होती. यानंतर विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराचे आयोजन देखील करण्यात आले. यावेळी तुळजापूर तालुकाध्यक्ष अमोल जाधव, शहराध्यक्ष बापूसाहेब भोसले, शहर उपाध्यक्ष काकासाहेब चिवचवे, महिला जिल्हा आघाडी मीनाताई सोमाजी, शिवसेना युवा अध्यक्ष सौरभ भोसले, शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष गणेश नेपते, महिला शहराध्यक्ष रेखा घोगरे, शहाजी हाके, स्वप्निल सुरवसे, नितीन मस्के, संजय लोंढे, संभाजी नेपते, मोहन भोसले, आफताब तांबोळी, गितेश जवळेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी जय तुळजाभवानी माता शाळेच्या वतीने उमाकांत तपसाळे, मुख्याध्यापक गरड, सोमवारे , पवार , श्रीमती जाधव , श्रीमती लोखंडे , शीलवंत , डोलारे आणि इतर शिक्षक व कर्मचारी वर्गाने उपस्थित राहून उपक्रमाचे स्वागत केले.

# भाजपची धाराशिव जिल्हा कृती कार्यक्रम बैठक उत्साहात

## कार्यकर्त्यांची एकजूट करून पक्षसंघटन बळकट करण्यावर भर





आरंभ मराठी | धाराशिव

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक ध्येय-धोरणांना मूर्त रूप देण्यासाठी जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आलेली धाराशिव जिल्हा कृती कार्यक्रम बैठक नुकतीच मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली. या बैठकीस आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर आणि माजी आमदार बसवराज पाटील प्रमुख व भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीदरम्यान आगामी काळात राबवण्यात येणाऱ्या पक्षाच्या विविध अभियानांची माहिती देण्यात आली. त्यात १०० जनता दरबाराबरोबरच उद्योग, व्यावसायिक निर्माण करणे, बूथ सक्षमीकरण, युवा संलग्नता, सामाजिक संवाद, संपर्क से समर्थन, मतदार पोहोच अभियान यांसारख्या उपक्रमांवर भर देण्यात आला. प्रत्येक तालुका, मंडळ आणि बूथ स्तरावर पक्षसंघटना अधिक प्रभावी करण्याच्या रणनीतींवर सखोल चर्चा करण्यात आली. या प्रसंगी आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर आणि माजी आमदार बसवराज पाटील आणि जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी भाजपचा विचार समाजाभिमुख आहे. हे तत्व कार्यकर्त्यांच्या वर्तनात आणि कामात दिसले पाहिजे. जनतेच्या मनात पक्षाबद्दल विश्वास निर्माण होणे हे संघटनेचे अंतिम ध्येय असायला अशा पद्धतीचे मार्गदर्शन केले. या बैठकीस माजी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, ज्येष्ठ नेते नितीन काळे, सर्व मंडळाध्यक्ष, पदाधिकारी, आणि जिल्ह्यातील विविध कार्यक्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी विभागनिहाय आपले अनुभव, अडचणी आणि आगामी रणनीती यावर मते मांडली. बैठकीचा मुख्य उद्देश कार्यपद्धतीत शिस्त, संवादात पारदर्शकता आणि कृतीत एकात्मता या त्रिसूत्रीवर पक्षसंघटनेची उभारणी करण्याचा होता, ज्याचे प्रत्यंतर उपस्थितांच्या सहभागातून दिसून आले.

# डिकसळ गाव चिखलमय; ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष, वाहतूकही झाली ठप्प



आरंभ मराठी | कळंब

गेल्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे डिकसळ गावातील रस्ते पूर्णपणे जलमय झाले असून, ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. गावातील एस.टी. कॉलनी, फरीद नगर, संभाजीनगर या भागांतील नागरिक सध्या पाण्याच्या वेढ्यात अडकले असून, अक्सा मस्जिद आणि मुख्य रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांचे हाल सुरू आहेत. मुख्य रस्ता पाण्याखाली गेल्यामुळे वाहतूक व्यवस्था पूर्णतः ठप्प झाली आहे. शाळकरी मुले, कामावर जाणारे नागरिक व रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रार करूनही अद्याप कोणतीही मदत पोहोचलेली नाही. काही भागांत तर गटारे तुंबल्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले असून त्यामुळे रोगराई फैलावण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आम्ही सतत तक्रारी करत आहोत, पण ग्रामपंचायतीकडून फक्त आश्वासने मिळत आहेत. पावसाळ्यात दरवर्षी हेच चित्र असते,'' असे स्थानिक रहिवासी सांगत आहेत. पाणी निघून जाण्यासाठी नालेसफाई व रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून उपाययोजना केल्यासच नागरिकांना या त्रासातून दिलासा मिळू शकतो.